# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

स्थायी समितीची सभा **मंगळवार दिनांक २९/१२/२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता** सिव्हील कार्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात नविन विषयावर विचार करण्याकरीता सभा आयोजित करण्यात येत आहे.

**नागपूर शहरात सध्या कोव्हीड-१९ या रागोचा प्रार्दुभाव असल्यामुळे सध्या या रोगाचा संसर्गाचा धोका टाळण्याकरिता उपरोक्त बैठकी प्रसंगी पदाधिकारी व अधिकारी वर्गांनी सोशल डिस्टंन्स/फिजीकल डिस्टंन्स, मास्क, सॅनीटायजर वापरावे**

आदेशान्वये

नागपूर
दिनांक :- **२४/१२/२०२०**

हस्ता/-
(डॉ. रंजना लाडे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

**<u>वि.क्र.३५ :-</u>**
**{सार्व.आरो. अभि. विभाग}**

नागपूर शहरातील एकूण १२ बगीच्यालगत वाहत असलेल्या नाल्यावर STP संयंत्र बसवुन नाल्यतील पाण्यावर प्रक्रिया करुन या पाण्याचा वापर बगीच्यात तसेच Non potable वापराकरिता करण्याचे कामाबाबत खालील प्रमाणे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व प्रावधान उपलब्ध करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१) १२ विविध क्षमतेचे STP संयंत्र मनपाच्या बगीच्यात उभारण्याचा एकूण खर्च रु. १,१२,००,०००/- च्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न विचारात घेणे.

२) १ वर्षाचे कालावधीकरिता १२ संयंत्रांचे सर्वसमावेशक संचलन व दुरुस्तीचे कामाकरिता रु. ९,००,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

सबब वरील प्रमाणे एकूण रु. १,२१,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व प्रावधान उपलब्ध करण्याचा प्रश्न विचारात घेणे. हे काम नियमित निविदा बोलावून करण्यात येईल.

टिप :-

१) STP तुन प्रक्रिया झालेल्या पाण्याचा वापर बगीच्यात पाणी देण्याकरिता, स्वच्छता गृहाकरिता, लोककर्म विभागा तर्फे रोड व इतर निर्माण कामांकरिता शहरातील बांधकामाकरिता तसेच Non potable वापराकरिता करता येईल. त्यामुळे Ground Water ची बचत होईल व ०.१०५ दलली प्रति दिन वाया जाणारे पाण्याच्या पुर्नवापर करता येईल. यामुळे मनपास अंदाजे २.६ लक्ष वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

**वि.क्र.३६ :-** केंद्र शासनाने नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम २०१६ मधील
**{समाजकल्याण विभाग}** तरतुदीनुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना सामुहिक तथा वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत व्यवसायाकरिता अर्थसहाय्य करण्यासाठी गठीत समिती मार्फत निश्चित धोरणानुसार TFC (कार्यबल समिती) मार्फत वैयक्तिक अर्थसहाय्याकरिता ९९ तसेच १ सामुहिक अर्थसहाय्याकरिता १०० मंजूर प्रस्तावानुसार येणारा रु. १,९५,१०,५७८/- च्या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**वि.क्र.३७ :-** म.न.पा. ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ नुसार
**{आरोग्य विभाग}** ''उपद्रव शोध प्रथक'' अंतर्गत १५१ लष्कारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती करण्याबाबत महासभेची मान्यता प्राप्त होती. त्यात ५० कर्मचारी भरती करून २०१ ची मान्यता मा. स्थायी समिती ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अंतर्गत दिली आहे. त्यानुसार खालील तालिका क्र. २ मध्ये नमुद लष्करी कर्मचारी ''उपद्रव शोध प्रथक'' अंतर्गत कार्यरत आहेत.

डिसेंबर २०१७ ते १८ नोव्हेंबर २०२० पर्यत पथकाद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम व त्यांना देण्यात आलेले देय तसेच म.न.पा. ला झालेला नफा खालील तालिकामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | वसुलीचे वर्ष | वसुली करण्यात आलेली रक्कम | जानेवारी २०१८ ते १८ नोव्हेंबर २०२० पर्यंत देण्यात आलेल्या देयची रक्कम | नफा |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/12/2017 ते 18/11/2020 | 8,16,38,450 /- | 7,46,95,863 /- | 69,42,587/- |

| अ.क्र. | पद | मंजुर पद संख्या | कार्यरत | मासिक देय |
|---|---|---|---|---|
| 1 | Squad Leader | 1 | 1 | 42000 |
| 2 | Zonal Squad Leader | 10 | 10 | 10 × 32000 = 3,20,000/- |
| 3 | Security Assistance पहिल्या टप्यातील पेट्रोल + मोबाईल भत्ता लागु असलेले | 190 | 27 | 27× 26000 = 7,02000 /- |
| 4 | Security Assistance ज्यांना पेट्रोल, मोबाईल भत्ता लागू नाही. | | 142 | 142 × 24000 = 34,08000/- |
| 5 | | 201 | 180 | 44,72,000/- |

उपरोक्त तालिकामध्ये नमुद लष्करी कर्मचारी यांना मासिक देय रू. ४४,७२००/— (चौरेचाळिस लक्ष बहात्तर हजार) रूपयाचा भार दर माह पडत आहे. चालु आर्थिक वर्षात दि. ०१/०४/२०२० ते दि. ३१/१०/२०२० पर्यंत खालील तालिका मध्ये नमुद राशी पथकाद्वारे वसुली करण्यात आली. सन २०२०—२१ चालु आर्थिक वर्षात ३० आक्टोंबर २०२० पर्यंत एकुण ३८,५१,५७५/— (अळतिस लक्ष एक्कावन हजार पाचशे पचांत्तर रूपये) नफा झाला आहे.

| अ. क्र. | वसुलीचे वर्ष | वसुली करण्यात आलेली रक्कम | देण्यात आलेल्या देयची रक्कम | नफा |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/04/2020 ते 31/10/2020 | 3,38,93,950 /- | 3,00,42,375 /- | 38,51,575/- |

म.न.पा. ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अन्वये SECURITY ASSISTANCE या पदाकरीता ११४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांना पथकात ११ महिण्याचा कंत्राटी करारावर कामावर घेण्यात आले होते. ११४ पैकी १५ कर्मचारी पथक सोडून गेल्याने त्यापैकी ९९ लष्करी कर्मचारी कार्यरत असून त्याचे ११ महिन्याचे कंत्राटी करार दि. २१ नोव्हेंबर २०२० रोजी संपत आहे. तरी उपद्रव शोध पथकातील नवे ११ महिन्याकरीता करार नव्याने करावे लागल्यास त्यांना ११ महिन्यात देण्यात येणारा अपेक्षित खर्च खालील प्रमाणे

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | प्रति माह वेतन प्रति व्यक्ती | प्रति माह वेतन एकुण पदाकरीता | कंत्राटी प्रमाणे ११ महिन्याचे वेतन एकुण पदाकरीता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Security Assistance | 99 | 24,000/- | 23,76,000/- | 2,61,36,000/- |

पथक अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांची कामगीरी कोरोना काळात फार महत्वाची होती. या वेळेस त्यांचे कार्य प्रशंसनीय होते व त्यांनी त्यावेळेस कार्यवाही करून माहे एप्रील ते ऑक्टोबर

२०२० पर्यंत २,७८,९३,९५०/— (दोन कोटी अठयात्तर लक्ष हजार नवशे पन्नास रूपये) दंड वसूल केले होते.

सबब ठराव क्र. ६७३ दि. २९/११/२०१९ अन्वये SECURITY ASSISTANCE या पदाकरीता कार्यरत ९९ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांचा दि. २०/११/२०२० रोजी संपत असलेला ११ महिन्याचा कंत्राटी करार नव्याने करण्याकरीता माहिती वरीष्ठांच्या माहितीस्तव व स्थायी समितीची मंजुरी मिळण्यास्तव सादर प्रस्तुत.

टिप :— सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

**वि.क्र.३८ :-**
**{प्रकाश विभाग}**

नागपूर शहरातील स्वयंचलित वाहतुक नियंत्रकाची देखभाल व दुरुस्तीचे काम मे. डेकोफर्न कंस्ट्रक्शन, नागपूर यांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक १५.०७.२०२० रोजी संपली असुन कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेता निविदेतील " सर्वसाधारण अटी व शर्ती " अन्वये मंजूर निविदाकार मे. डेकोफर्न कंस्ट्रक्शन, नागपूर यांचे कडुन मंजूर निविदा दरानुसार (प्राकलनिय दरापेक्षा १५.३% ने कमी ) पुढील सहा महिने पर्यंत रु. २४,०९,४४०/- ची कामे करवुन घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सदर कामाचा खर्च आय - व्यय पद क्र. A२२५०१७३०८१९ (जुने ३७३) अंतर्गत करण्यात येईल.

**वि.क्र.३९ :-**
**{नगर रचना विभाग}**

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नकाशे /झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दराबाबत.

**संदर्भ** :— शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. संकीर्ण —5019/प्र.क्र. 114/ 2019/नवि—27, दि. 28.10. 2020.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस — 2496 —2643— प्र.क्र.300(अ)—97—नवि—9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस—2400—1628—सी.आर. —200—नवि—9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस — 2401—885—प्र.क्र.—76/नवि—9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस—2419— 1419 —प्र.क्र.—154—2019—नवि—9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

कृपया सोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण—5019 / प्र.क्र- 114/2019/नवि—27, मंत्रालय, मुंबई दि. 28.10.2020 अवलोकन व्हावे.

सादर निर्णयानूसार नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागाकडील नकाशे/झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दर निश्चित केलेले आहे. सदर दर खालीलप्रमाणे आहेत.

## विवरण पत्र –अ

(अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline देण्याकरीता शुल्क दर्शविणारा तक्ता.

| अ. . | नकाशा/दाखला तपशिल | विद्यमान दर (रूपयांत) | | सुधारीत दर (रूपयांत) (Color प्रत) |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | -- | 50 | 3000 |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | -- | 30 | 300 |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे) रू. 5/– प्रती पान<br>A- 4 रू. 50/–<br>A-3 रू. 100/–<br>A-2 रू. 150/–<br>A-1 रू. 200/– (नकाशा) |

ब) भाग नकाशे / झोन दाखले Online पध्दतीने देणेकरीता शुल्क – नगर संचालनालयाच्या विविध कार्यालयाकडून A- 4 आकाराचे भाग नकाशे Online पध्दतीने उपलब्ध होण्यासाठी रू. 250/– प्रती सर्व्हे नंबर.

नागपूर महानगरपालिकेने यापुर्वी वरील बाबीकरीता आकारावयाचे प्रचलित शुल्क महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. 17.07.2015 रोजी प्रसिध्द केलेले असून सध्या त्याप्रमाणेच शुल्क आकारणी करण्यात येत आहे, ते खालीलप्रमाणे आहे.

| अ. | लोकसेवांची सुचि | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशीत अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | झोन दाखला देणे (भाग नकाशाची प्रत देण्याबाबत. | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे नकाशा | रू. 300/— | 7 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |
| 2 | भाग नकाशा देणे | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे नकाशा | रू. 300/— | 3 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |

नागपूर महानगरपालिकाकडील प्रचलित शुल्क व शासनाने संदर्भीय निर्णयान्वये निर्धारीत केलेल्या शुल्कात तफावत असल्याने व प्रचलित दराने वरीलप्रमाणे भाग नकाशे/झोन दाखले अर्जदारांना देणेविषयीच्या खर्चात वाढ झालेली असल्याने नागपूर महानगरपालिकेच्या प्रचलित दरात सुध्दा शासन निर्णयाच्या अनुषंगाने वाढ करणे आवश्यक ठरते. त्यानूसार नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या भाग नकाशे/झोन दाखले या करीता शासन निर्णयानूसार आकारावयाचे शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे.

| अ. . | नकाशा/दाखला तपशिल | विद्यमान दर (रूपयांत) | | सुधारीत दर (रूपयांत) (Color प्रत) |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम | -- | 50 | 3000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | | | |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | -- | 30 | 300 |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे) रू. 5/— प्रती पान<br>A- 4 रू. 50/—<br>A-3 रू. 100/—<br>A-2 रू. 150/—<br>A-1 रू. 200/— (नकाशा) |

ब) भाग नकाशे झोन दाखले Online पध्दतीने देणेची प्रक्रिया सध्या नागपूर महानगरपालिकाकडून केल्या जात नसल्याने त्या बाबत धोरण भविष्यात निश्चित करणे उचित होईल.

तरी संबंधीत विवरण पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे (अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline पध्दतीने जनतेला उपलब्ध करून देण्याकरीता शासनाचे संदर्भीय निर्णयाच्या धर्तीवर आकारवयाचे शुल्कात वाढ करणेकरीता मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. स्थायी समितीने सदर विषयास मान्यता प्रदान केलेनंतर त्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करणे व ज्या दिवशी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द होईल त्या दिवसापासून वरील दर लागू होतील त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे सुधारीत दरास मान्यता देणेचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

**<u>वि.क्र.४०</u> :-** अंबाझरी धरणाचे बळकटीकरण व मजबुतीकरण
**{सार्व. आरो.अभि. विभाग}** करणेबाबत.अंबाझरी धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने करावयाच्या कामाबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. अंबाझरी धरणाचे बळकटीकरण करण्याच्या कामाकरीता येणा-या एकूण रू. २१,०६,९२, ८४३/- या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
   या अंतर्गत प्राधान्य क्र. १ व २ चे काम महानगरपालिका व मेट्रोच्या निधीतून करण्यात येतील. उर्वरीत कामे राज्य शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरच सुरू करण्यात येतील, महानगरपालिका याकरीता कोणताही खर्च वहन करणार नाही, ही बाब विचारात घेवून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
२. जलसंपदा विभागाद्वारे सादर करण्यात आलेल्या कामाच्या गोषवा .यापैकी प्राधान्य क्र-१ वरील या धरणाच्या सांडव्याच्या जीर्ण भिंतीची दुरुस्ती करणेस्तव लागणाऱ्या रु.३,१४,५८,०४६/- या निधी नागपूर

एनव्हायरमेंटल सर्विसेस लि. या कंपनी करीता मनपा तर्फे मंजूर पद क्र. A४२८०१९४०७०१ अंतर्गत निधीतून उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

३. तसेच प्राधान्य यादीतील उर्वरीत कामांकरीता प्राधान्यानुसार ज्या ज्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल त्यानुसार सदर कामे करण्यास परवानगी प्रदान करणे.
४. वरील कामे ठेव तत्वावर जलसंपदा विभागामार्फत करण्यास परवानगी प्रदान करणे.

टिप :-

१. सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.
२. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या कामाकरीता येणा-या एकूण रु. २१,०६,९२,८४३/-खर्चापैकी मेट्रो रेल प्राधिकरणास वहन करावयाचे रू. ३,३५,००,०००/- वजा करता उर्वरीत रू. १७,७१,९२,८४१/- ची मागणी राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**वि.क्र.४१ :-** नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांना संगणक चालकांचा पुरवठा करण्याबाबत.
**{साप्रवि}**

स्थायी समिती ठराव क्रं. 784, दि. 19/12/2019 च्या अनुषंगाने उपरोक्त कामाकरीता स्थायी समितीच्या निर्देशाप्रमाणे निविदेतील अटी व शर्तीचे पुनर्विलोकन करुन अटी व शर्ती मध्ये बदल झाल्यामुळे या निविदेस नविन निविदा म्हणून काढण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर ठराव क्रं. 784 अद्याप कार्यान्वीत झालेला नसून खाजगी एजेन्सी तर्फे संगणक चालक नियुक्त न करता संगणक चालक हे मनपाकडून lumpsum तत्वावर निवडून कंत्राटी पध्दतीने मानधन रु. 15,500/- प्रति मॅनेजर कंम्प्यूटर ऑपरेटर (संगणक चालक) प्रति माह ईतक्या ठराविक मानधनावर कंत्राटी पध्दतीने नियुक्त केल्यास यावर सद्यस्थितीत होणा-या खर्चात अंदाजे रु. 253 लक्ष वार्षिक बचत होउ शकेल. या प्रस्तावास दि. 01/07/2020 रोजी मा. आयुक्त, मनपा यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानूसार संगणक चालकांचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1. खाजगी एजेन्सीमार्फत संगणक चालक उपलब्ध करुन घेणेची विषयांकित निविदेची बाब रद्द करणे व सदर प्रस्तावित प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत अस्तीत्वात असलेल्या एजेन्सी मार्फत कामकाज सुरु ठेवणे.
2. नागपूर महानगपालिकेच्या विविध विभागात अंदाजे 186 संगणक चालक कार्यरत आहेत. मा आयुक्त, मनपा यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावानुसार प्रति संगणक चालक प्रति माह रु. 15,500/- याप्रमाणे सहा महिन्यासाठी एकूण खर्च रु. 1,72,98,000/- ईतका अपेक्षित आहे. संगणक चालक हे पद मॅनेजर कंम्प्यूटर ऑपरेटर असे संबोधन करुन त्याप्रमाणे जाहिरात काढून कंत्राटी पध्दतीने हे पद भरण्यास व आवश्यक खर्चास मंजुरी प्रदान करणे .
3. प्रत्येक 6 महिन्यानंतर कार्यरत सर्व संगणक चालकांचा कामाचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील 6 महिन्याकरीता सर्व संबधित संगणक चालकांच्या कंत्राटी सेवांचे नुतनीकरण करणे, व वेळोवेळी विभागाच्या आवश्यकतेनुसार सदर मनुष्यबळाची संख्या कमी / अधिक करण्याचे अधिकार मा. आयुक्तास प्रदान करणे.

सबब उपरोक्त मुद्दा क्र. 1, 2 व 3 बाबतचे प्रश्न विचारात घेऊन त्यास मंजुरी प्रदान करणे.

टिपः-

1. हा खर्च पद क्रं. A28900130607 अंतर्गत करण्यात येईल व या पदांतर्गत अर्थसंकल्प 2020-2021 मध्ये रू. 900 लक्ष चे प्रावधान उपलब्ध आहे.

————————